ePaper

# कुणाल कामरा याला दिलासा, मद्रास हायकोर्टाने दिला महत्वाचा निर्णय




| वर्ष - 8 | अंक - 256 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 8 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- किंग कोहलीने घडवला इतिहास!
- संघांनी केलं दुर्लक्ष, गुजरातने हेरला हिरा
- तेल व अन्नधान्याच्या किमती घटल्या
- ट्रम्प यांनी भ्रमाचा भोपळा फोडला


### 'दीनानाथ हॉस्पिटल' चे प्रमुख डॉ. केळकर यांची पत्रकारांपुढे भंबेरी

# 'दीनानाथ'ला केवढी तळमळ, 'डीन' ने वैतागून काढला पळ!

### डॉ. घैसास यांच्या राजीनाम्याने संशय बळावला ; रूपाली चाकणकर यांची खंबीर भूमिका

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुण्यातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या गर्भवती महिलेवर पैशाअभावी उपचार केले गेले नाहीत आणि तिचा नंतर मृत्यू झाला. याप्रकरणी वातावरण प्रचंड तापले असतानाच आणि राज्यभरातून संताप व्यक्त होत असतानाच तिच्यावर उपचार नाकारणाऱ्या डॉ. सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिल्याने गोंधळात भर पडली आहे. दरम्यान, सर्व खुलासा करण्यासाठी हॉस्पिटलचे प्रमुख डीन डॉ. धनंजय केळकर यांनी पत्रकार परिषद बोलावली खरी, पण प्रश्नांची सरबत्ती पाहून त्यांनी पत्रकारांसमोर चक्क धूम ठोकली. तेथून अक्षरशः पलायन केले !**





### कळा येत असताना साडेपाच तास बसवले !

या गर्भवती महिलेला दहा लाख भरल्याशिवाय ॲडमिट करून घेण्यास नकार देण्यात आला होता. पण, तिला प्रसुतीच्या कडा सुरू झाल्या असताना सुद्धा साधारण साडेपाच तास ताटकळत बसवले, हे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत आहे, असा खुलासाही चौकशी समितीने केला आहे.

### डॉ. केळकर यांची त..त..प..प!

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर यांनी पत्रकारांशी बोलताना विविध प्रश्नाला सुरुवातीला उत्तरे दिली. पण त्यांची भंबेरी उडाली. आम्ही कधीही फॉर्मवर डिपॉझिट असे लिहीत नाही. माझ्या एवढ्या वर्षांच्या काळात कधीच असे केले नव्हते. पण, त्या दिवशी राहू-केतू डोक्यात काय आले आणि या लोकांनी डिपॉझिट लिहून काय दिले ? माहीत नाही, अशी प्रतिक्रिया डॉ. केळकर यांनी दिली.

### आंदोलने, आरोप प्रत्यारोप सुरूच..

दीनानाथ हॉस्पिटलच्या विरोधात आंदोलने अजूनही सुरूच आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनीही पत्रकार परिषदांमध्ये रुग्णालय व्यवस्थापनाच्या विरोधात कडक कारवाई करण्याची मागणी केली

### खासदार मेधा कुलकर्णी आक्रमक..

गर्भवती महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे दीनानाथ हॉस्पिटलवर टीकेची झोड उठवण्यात आली आहे. हॉस्पिटलच्या निष्काळजीपणाने मृत्यू पावलेल्या महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी अनेक संघटनांनी आंदोलने आणि घोषणाबाजी सुरू ठेवली आहे. त्यात भाजपाच्या महिला मोर्चाच्या काही कार्यकर्त्यांनी डॉ. घैसास यांच्या क्लिनिकची तोडफोड केली. भाजपाच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी या प्रकरणामुळे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचे कान टोचले असून घरचा आहेर दिला आहे.

### डॉ. घैसास यांच्या राजीनाम्याबाबत डॉ. केळकर यांचे स्पष्टीकरण!

डॉ. केळकर यांच्यावर पत्रकारांनी प्रश्नांची सरबत्ती केली. त्यात प्रथम त्यांची भंबेरी उडाली. डॉ. केळकर म्हणाले, की आम्ही सगळ्यांकडून डिपॉझिट घेत नाही. गरीब लोकांकडून तर अजिबातच घेत नाही. ज्यांना जमेल त्यांना पैसे मागितले जात होते. पण, याप्रकरणानंतर आम्ही डिपॉझिट ही पॉलिसीच रद्द केली आहे. येथून पुढे ते घेतले जाणार नाही. डॉ. घैसास हे कन्सल्टंट म्हणून गेली दहा वर्षे काम करीत आहेत. 'दडपणाखाली वागत असून धमक्यांचे फोन पाहता मी राजीनामा देत आहे, असे त्यांनी म्हटले आहे. मला व्यवस्थित काम करता येणार नाही म्हणून मी राजीनामा देत आहे, असे त्यांनी पत्रात लिहून देऊन आमच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आहे, असे डॉ. केळकर यांनी स्पष्ट केले आहे.

### सोम्या, गोम्या असा उल्लेख..

खासदार कुलकर्णी यांनी म्हटले आहे, की आपण भाजपाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांना पत्र पाठवले असून त्यात सोम्या, गोम्या असा उल्लेख करत भाजपा पदाधिकाऱ्यांना फैलावर घेतले आहे. पत्रात त्यांनी असे म्हटले आहे, की कुठल्याही सोम्या-गोम्याने, अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेणे योग्य नाही. शिवाय, डॉ. घैसास यांच्या वडिलांच्या क्लिनिकची तोडफोड करणे, हे भाजपाच्या पुणे महिला मोर्चाच्या अध्यक्षा हर्षदा फरांदे आणि इतर अधिकाऱ्यांना निश्चितच शोभलेले नाही.

### हॉस्पिटल मधील 'आका' कोण?

दरम्यान, पुण्यातील मनसेचे नेते राम बोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणाचा तपास करणाऱ्या वैद्यकीय समितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण पवार यांना अध्यक्षपदावरून हटवण्याची त्यांनी मागणी केली आहे. डॉ. पवार यांच्यावर अनेक वेळा त्यांच्या शासकीय कामात कोट्यवधी रुपयांचा आर्थिक भ्रष्टाचार केल्याबाबत आरोप ठेवण्यात आले आहेत. धर्मादाय दीनानाथ हॉस्पिटल म्हणजे एक 'आका' आहे आणि त्याची चौकशी एका प्रशासकीय 'आका' म्हणजे रामकृष्ण पवार हे कसे करू शकतात? असा सवाल त्यांनी केला आहे.

### दोषींवर कडक कारवाई करा..

दीनानाथमध्ये रुग्णांच्या जीवापेक्षा पैशाला प्राधान्य दिले जाते. या प्रकरणी सर्वांची सखोल चौकशी करा आणि त्यातील दोषींवर कडक कारवाई करा, अशी मागणी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आली आहे. काही पळवाटा शोधायच्या आहेत का क्लीन चीट द्यायची आहे, ते पण जाहीर करा, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

# डॉक्टरांनी डिपॉझिट मागितले होते!

## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाची कबुली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा भिसे यांचं प्रसुतीदरम्यान निधन झालं. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने १० लाख रुपये अनामत रक्कम भरण्यास सांगितल्याने भिसे कुटुंबियांना दुसऱ्या रुग्णालयात जावं लागलं. या गदारोळात तनिषा भिसे यांची प्रसूती झाली. त्यांनी जुळ्या मुलींना जन्मही दिला. पण प्रसूतीनंतर तनिषा भिसे यांचं निधन झालं.**




या प्रकरणामुळे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सर्वत्र टीका होत असताना रुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी डॉ. धनंजय केळकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. मात्र, माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे न देताच त्यांनी आज पत्रकार परिषद गुंडाळली. भिसे कुटुंबियांना अनामत रक्कम भरण्यास सांगण्यात आले होते का? डॉक्टर अशा पद्धतीने डिपॉझिट भरण्यास सांगू शकतात का? असे प्रश्न डॉ. धनंजय केळकर यांना विचारण्यात आले होते. त्यावर ते म्हणाले, "आमच्याकडे डॉक्टर कोणत्याही रुग्णाकडून डिपॉझिट मागत नाहीत. कारण तशी पद्धतच आमच्याकडे नाही. रुग्णालयाकडून खर्चाचे अंदाजपत्रक प्रत्येक रुग्णाला दिलं जातं. त्यावरही डिपॉझिट लिहायची पद्धतच नाही. त्यादिवशी कोणत्या कारणाने राहू-केतू काय डोक्यात मध्ये आला, डॉ. घैसास यांनी चौकोनात १० लाखांचं डिपॉझिट लिहिलं. ही गोष्ट खरी आहे. पण यापैकी (उपस्थित डॉक्टर) तुम्ही कोणालाही विचारू शकता, डॉक्टरांकडून अनामत रक्कम मागितली जात नाही. आजवर मी अगणित शस्त्रक्रिया केल्या आहेत, पण आतापर्यंत कोणालाही असं लिहून दिलं नाही", असं डॉ. धनंजय केळकर यांनी स्पष्टीकरण दिलं.डॉ. सुश्रूत घैसास हे या रुग्णालयाचे मानद प्रसुती व स्त्रीरोग तज्ज्ञ आहेत. ते रुग्णालयाचे कर्मचारी नसून ते गेले १० वर्षे कन्सल्टन्ट म्हणून काम करतात. त्यांनी राजीनामा दिला आहे. गेले काही दिवस ते सामाजिक दडपणाखाली वावरत आहेत, धमक्यांचे फोन, समाजमाध्यमांवर होणारी कठोर टीका आणि सामाजिक संघर्षामुळे होणारे वातावरण त्यांच्या सहन करण्याच्या पलीकडे आहे. त्याचा आताच्या रुग्णांच्यावर उपचारांवर परिणाम होईल अशी भीती वाटत आहे.

यामुळे त्यांच्या वैद्यकीय विषयावर पुरेशा प्रमाणावर लक्ष केंद्रीत करू शकत नाहीत, रात्रीही झोपू शकत नाहीत. त्यामुळे इतर रुग्णांवर अन्याय होण्यापेक्षा आणि कुटुंबाच्या संरक्षणाकरता त्यांनी दीनानाथ रुग्णालयातील पदाचा राजीनामा दिला आहे. ते फक्त इथेच काम करतात", असंही डॉ. केळकर म्हणाले. अनामत रक्कम घेण्याची पॉलिसी लहान रक्कमांसाठी नव्हती. ५ ते १० लाखांच्या रकमांकरिता ही पॉलिसी होती. पण गेल्या चार पाच दिवसांपूर्वी ही पॉलिसी बंद करण्यात आली आहे. गरीब रुग्णांकडून अनामत रक्कम घेतले जात नव्हते.रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिताण असल्याने जी संवेदनशीलता किंवा माधुर्य पाहिजे ती कधीकधी कमी होते. ती सुधारण्यासाठी प्रशिक्षण सुरू करण्यात आले. माध्यमांना जो अहवाल दिला, त्यामध्ये रुग्णाची कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. अहवाल शासनाला पाठवला आहे. माध्यमांना जी माहिती दिली तो घटनाक्रम सांगितलेला आहे. आता मेडिकल उपचार काय दिली गेली हे शासनाच्या अहवालात आहे. पूर्वीचे काय आजार आहेत.

### आम्ही कोर्टात टॅक्स भरतो


एकही रुपयाचा टॅक्स थकलेला नसून आम्ही थेट कोर्टात टॅक्स भरतो. टॅक्स आकारणीची प्रथा कर्मिशिअल केली, त्याविरोधात आम्ही कोर्टात याचिका दाखल केली होती. कोर्टाने दिलेल्या निकालानुसार आम्ही कोर्टात टॅक्स भरतो.भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा भिसे यांचं प्रसुतीदरम्यान निधन झालं.

# विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात: भाऊ तोरसेकर

## मेनका प्रकाशनच्या खमंग टमंग च्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात तोरसेकर,टोकेकर यांची फटकेबाजी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात असते आणि विनोद लेखनही प्रत्येकाला सुचत असते तथापि पूर्वतयारी करूनही विनोदी लेखन करता येत नाही",असे मत ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी शनिवारी व्यक्त केले.मेनका प्रकाशन ने प्रकाशित केलेल्या आणि ज्येष्ठ पत्रकार भगवान दातार लिखित 'खमंग टमंग' या खुमासदार पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुण्यातील टिळक रोड येथील न्यू इंग्लिश स्कूल मधील गणेश सभागृहात शनिवारी (दिनांक ५) पार पडला.'खमंग टमंग' चे प्रकाशन तोरसेकर यांचे हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.**




ज्येष्ठ पत्रकार प्रवीण टोकेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेनका प्रकाशन चे व्यवस्थापकीय संचालक अभय कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते.

भाऊ तोरसेकर म्हणाले की विनोद गुदगुल्या करणारा असावा त्यात ओरखडे काढलेले नसावेत. एखाद्याला डिवचून विनोद करता येत नाही तुमचा हेतू काय यावर विनोदाचा अर्थ ठरत असतो अधिकाऱ्याच्या घोड्यावर जबाबदारी बसते तेंव्हा ती संविधानिक होते. माध्यमामुळे चळवळी संपल्या. अनेक चळवळी केवळ कॅमेऱ्या पुरत्या उरलेल्या आहेत असे वक्तव्य त्यांनी केले.डोळ्यासमोरच्या बातम्या पत्रकारांना दिसत नाहीत फक्त पत्रकार परिषदेतल्या बातम्या सध्याचे पत्रकार करतात अशी टीकाही त्यांनी एकांगी पत्रकारिता करणाऱ्यावर केली. प्रवीण टोकेकर म्हणाले,की विनदात वैर नसते वैरभाव माणसांमध्ये असतो.विनोद हा दोस्तांच्या कोंडाळ्यात रमणारा असतो. विनोद हा मैत्री करू शकतो पण विनोद शस्त्र वगैरे नसते.विनोदी लेखन ही एक कसरत असते. त्याला एक मर्यादा आहे आपण ती पाळली पाहिजे.अपमान करणे हा नवीन प्रकार सध्या विनोदाच्या नावाखाली रुळला आहे.हे सांगताना ते म्हणाले की,स्टँड अप कॉमेडी च्या नावाखाली कुणाल कामराने जे केले त्याला विनोद म्हणता येत नाही.महाराष्ट्र नावाची एक व्यवस्था आहे त्याला कुणाल कामरा विचारत नाही त्यामुळे कुणाल कामराला विनोदवीर म्हणणे ही गफलत होत आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला केतकी दातार हिने सरस्वती स्तवन सादर केले.भगवान दातार यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नाट्यकर्मी सुधीर मोघे यांनी सूत्रसंचालन केले.जेष्ठ संपादक मल्हार अरणकल्ले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.आरती देशपांडे ह्यांनी आभार मानले. कार्यक्रमास राज्यातील मध्यम क्षेत्रातील प्रतिनिधी,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नेत्यांमुळे लेखनाची प्रेरणा...

खमंग टमंग पुस्तकाचे लेखक भगवान दातार यांनी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की,सध्याच्या काळात राजकीय दांभिकतेवर भाष्य करण्यासाठी उपहास आणि विडंबन याचा शस्त्र म्हणून वापर करण्यात येतो या प्रकारच्या लेखनशैलीमध्ये वापर करीत तत्कालीन राजकीय नेते प्रसंग आणि घटना यावर भाष्य करणारे लेखन केले हे सांगतांना त्यांनी शरद पवार,उद्धव ठाकरे,बाळासाहेब थोरात यांच्यामुळे लेखनाची प्रेरणा मिळाली,असेही त्यांनी नमूद केले. हे सांगताना त्यांनी अभय कुलकर्णी यांनी भगवान दातार यांनी त्यांचे लिखाण प्रसिद्ध करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले.

## मोईतील आगीच्या घटनेमुळे कुदळवाडीची दाहकता ‘अधोरेखित”

# महापालिका प्रशासनाच्या भूमिकेला मिळाली ‘पुष्टी’!

## एकेकाळी हरीत असलेली कुदळवाडी प्रदूषित झाली कशी?

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या मोई येथे एका भंगार दुकानाला आग लागल्याची घटना नुकतीच घडली. यामुळे कुदळवाडी अतिक्रमण विरोधी कारवाईच्या आठवणी ताज्या झाल्या. वाढते आगींच्या घटना, राष्ट्रीय सुरक्षा आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी केलेली कुदळवाडीची कारवाई ही काळाची गरज होती, असे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.**




जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांनी ज्या ठिकाणी टाळ ठेवले. असे वारकरी व अध्यात्मिक वारसा असलेले टाळगाव चिखली गावची एक वाडी म्हणजे आजची कुदळवाडी आहे. चिखलीचे ग्रामदैवत श्री. भैरवनाथ महाराज यांचे पुरातन मंदिर कुदळवाडीत आहे. हरगुडेवस्ती- पवारवस्ती- बालघरे वस्ती- जाधववाडीचा काही भाग म्हणून ओळखला जातो.

सुमारे 40 वर्षांपूर्वी ग्रामस्थांचा मुख्य व्यावसाय शेती, दूध उत्पादन हा उत्पन्नाचा स्त्रोत होता. पिंपरी-चिंचवडमध्ये 1954 मध्ये हिंदूस्थान ॲन्टिबायोटिक्स कंपनीची निर्मिती झाली. त्यानंतर 1960-70 च्या दशकात औद्योगिक कंपन्या स्थापन होवू लागल्या. बजाज, टेल्को, बजाज टेम्पो, प्रिमिअर, रस्टन, आडवाणी, कायनेटिक इंजिनीअरिंग असा कंपन्या निर्माण झाले. तोपर्यंत आजची कुदळवाडी हरित होती. शेती होती. मात्र, अवघ्या 30 ते 40 वर्षांत कुदळवाडी प्रदूषित झाली ती का? याचे आवलोकन केले पाहिजे.

### ... असे झाले ‘भंगारवाडी’चे स्थलांतर!

पिंपरी-चिंचवड एमआयडीसी क्षेत्रातून निर्माण होणारा औद्योगिक कचरा पूर्वी आकुर्डी येथे टाकला जात होता. त्याठिकाणी ‘‘भंगारवाडी’’ तयार झाली. मात्र, औद्योगिक क्षेत्राचा विस्तर झाला. तसा या भागातील भंगार व्यापाऱ्यांनी कुदळवाडी भागात स्थलांतर होवू लागले. भौगोलिक दृष्टया कुदळवाडी हा भाग औद्योगिक क्षेत्रालगत असल्यामुळे या भागात औद्योगिक कंपन्यांना लागणारे छोटे पार्ट पुरवठा करण्यासाठी लघु उद्योग निर्माण झाले. मोठ्या प्रमाणात भंगार व्यासायिकांनी या भागात भाड्याने किंवा विकत जमीन घेतली आणि कुदळवाडीची ओळख “भंगार हब” अशी होवू लागली


### देशातील मोठी अतिक्रमण कारवाई...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने दि. 7 फेब्रुवारी 2025 रोजी अतिक्रमण कारवाई सुरू केली. अवघ्या 8 ते 10 दिवसांमध्ये सुमारे 900 एकर क्षेत्र अतिक्रमण हटवण्यात आले. डिसेंबर-2024 मध्ये कुदळवाडीमध्ये भीषण आग लागली. त्याचे पडसाद विधानसभा सभागृहात उमटले आणि हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने स्थानिक आमदार महेश लांडगे यांनी बेकायदा भंगार दुकानांवर कारवाईची मागणी केली. तसेच, राष्ट्रीय सुरक्षा, अवैध धंदे, इंद्रायणी नदी प्रदूषण अशा मुद्यांकडे लक्ष वेधण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची गंभीर दखल घेतली आणि पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. वारकरी सांप्रदाय आणि हरित कुदळवाडीचा प्रवास प्रदूषित ‘भंगार हब’ पर्यंत झाला आणि अखेर “‘अंतः अस्ति प्रारंभः” प्रमाणे कुदळवाडी पुर्नजन्म घेण्याच्या स्थितीत आहे.

### कुदळवाडीचे गावपण हरपले?

भंगार व्यावयासामुळे कुदळवाडीचे गावपण हरपले. मुस्लिम लोकवस्ती प्रचंड वाढली. धार्मिक तेढ निर्माण होईल, असे चित्र झाले. त्याप्रमाणे गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळाले. राष्ट्र सुरक्षा आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाला कारणीभूत कृतींचे ‘कनेक्शन’ कुदळवाडीसोबत जोडले जावू लागले. महानगरपालिकेत चिखली-कुदळवाडीचा समावेश झाल्यानंतर नागरिकरण प्रचंड वाढले. वारंवार आगीच्या घटना आणि प्रचंड धुराचे लोट, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणामुळे सभोवतालच्या नागरिकांना, सोसायटीधारकांना त्रास होत होता. अनधिकृत बांधकांचे जाळे या भागात निर्माण झाले. कुदळवाडीचे गावपण अरक्षरश: हरपले, असे निरीक्षण जुने-जाणते नोंदवतात.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही

पुष्कळ वाचले, ऐकले, पण कृतीत जर उतरले नाही तर त्याचा काय उपयोग? कृतीशिवाय समाधान नाही. श्रवण कोणी केले? तर ज्यांनी त्याप्रमाणे कृती केली त्यांनी. संतांच्या सांगण्याचा आपण विचारच केला नाही, त्याचे मननच जर केले नाही, तर पुष्कळ सांगितले तरी त्याचा काय उपयोग? देह हा अनित्य आहे, असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे, तरीसुद्धा आम्हांला देहाचे प्रेम सुटत नाही, याला काय करावे? संतांवर विश्वास नसेल तर स्वतःचा अनुभव पाहावा. देहापासून सर्व सुख आहे असे आपण विचाराने ठरविले, पण खरोखर अनुभव काय येतो ते पाहावे. आपण पाहतो ना, की लहानापासून मोठ्यापर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत, मनुष्याची सारखी धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधानासाठी. लहानाचे मोठे झालो, विद्या झाली, नोकरी मिळाली, पैसाअडका मिळतो आहे, बायको केली, मुलेबाळे झाली; ज्या ज्या गोष्टीत समाधान मिळेल असे वाटले, त्या त्याकरिता प्रयत्न केला. परंतु मग तरी समाधानाचा लाभ झाला का? देहाच्या प्रेमाशिवाय प्रापंचिक गोष्टी चालणार नाहीत हे खरे; पण म्हणून देहाच्या सुखाकरिताच जन्मभर आटापिटा करायचा हे योग्य नव्हे. आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही. या देहाचे कौतुक करीत असताना दुसऱ्याची घरभरणी चालली आहे. त्याचा फायदा आपल्याला काहीच होत नाही. देह गेला की सगळे गेले!

कृतीशिवाय जे बोलतात त्यांचा नाश होतो. बोलावे असे वाटते तोपर्यंत बोलणे थांबविणे जरूर आहे. स्वातंत्र्य आणि स्वैरवर्तन बाहेरून सारखीच दिसतात; पण त्यांच्यामध्ये फार फरक आहे. स्वातंत्र्य हे पवित्र आहे, तर स्वैरवर्तन हे घाणेरडे आहे. लोकांच्या स्वातंत्र्याविषयीच्या कल्पना काहीतरीच असतात. खरे म्हणजे, माणसाला स्वातंत्र्य फक्त स्वतःची उन्नती, म्हणजे आत्मोन्नती करण्यापुरतेच आहे. इतर बाबतीत, म्हणजे देहाच्या वगैरे बाबतीत, त्याला बंधनेच असतात, आणि ती आवश्यकच आहेत. देहासंबंधीचे बाप, मुलगा, नवरा, बायको वगैरे म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य राहणारच, पण मनुष्यत्वाचे कर्तव्य असेल तर भगवंताचे होणे हे आहे. ऑफिसला जाणाऱ्यांनी आपले कर्तव्य नीट बजावावे; घरातल्या मंडळींनी आपले काम मन लावून करावे; आणि हे सर्व करून राहिलेला वेळ भगवंताच्या नामात घालवावा. आपण एखादा व्यापार केला तर त्यामधले निव्वळ उत्पन्न हाच आपला खरा नफा असतो, त्याचप्रमाणे प्रपंचातला नफा म्हणजे भगवंताकडे आपले लक्ष किती लागले हा होय.

**बोधवचन:- जेथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे, तेथेच समाधानाची प्राप्ती होते.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# 'ब्लॅक मंडे'च्या फटक्यामुळे, बुडाले ₹ 13.5 लाख कोटी !

**भारतीय शेअर बाजारासह संपूर्ण जगातील शेअर बाजारात सोमवारी मोठी घसरण दिसून आली. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे हजारो कोटी रुपये बुडाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची टॅरिफ घोषणा आणि त्याला चीनने दिलेल्या जशास तशा प्रत्युत्तरामुळे शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. यामुळे गुंतवणुकांचे धाबे दणाणले आहे.**

### सेन्सेक्स, निफ्टी घसरण..

आज भारतीय बाजारात सेन्सेक्स २,२२६ अंकांनी घसरून बंद झाला तर निफ्टी २२,२०० च्या खाली आला. या घसरणीमुळे भारतीय बाजारात तब्बल १३.५ लाख कोटी रुपये बुडाले, ही बाब गंभीर आहे!


### डोनाल्ड ट्रम्प यांची दहशत..

ही जी काही आर्थिक परिस्थिती उद्भवली आहे ती अर्थतज्ज्ञांच्या इशाऱ्याला केराची टोपली दाखवत ट्रम्प यांनी टॅरिफ लागू करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे! ट्रम्प यांचा हा निर्णय म्हणजे मी बुडणारच, पण, तुम्हालाही सोबत घेऊन बुडणार असाच आहे.

### परस्पर शुल्काचा नकारात्मक परिणाम

परस्पर शुल्काचा आंतरराष्ट्रीय बाजारांवर नकारात्मक परिणाम होत आहे. यात अमेरिकेसोबत अनेक देशांच्या शेअर बाजारांत मोठी घसरण झाली आहे. यात जपान, कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि भारतासह अनेक देशांच्या शेअर बाजारात






अक्षरशःभूकंप झाला आहे. भारतात तर कोरोनानंतर सर्वात मोठा क्रॅश झाला आहे. आज 'ब्लॅक मंडे' ठरू शकतो, असे अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### बाजारात सर्वाधिक घसरण कोठे?

आशियायी शेअर बाजारांमध्ये सोमवारी मोठी घसरण दिसून आली. बाजार उघडताच जपानचा निक्केई २२५ अंकांनी घसरला. ऑस्ट्रेलियाचा एस अँड पी २००६.५ टक्क्यांनी घसरून ७१८४.७० वर, तर दक्षिण कोरियाचा कोस्पी ५.५ टक्क्यांनी घसरून २३२८.५२ वर आला. दरम्यान, शुक्रवारी अमेरिकन नॅस्डॅक बाजार सुमारे सात टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाला होता. तज्ज्ञांच्या मते ही घसरण काहीच नाही, जर परिस्थिती नियंत्रणा बाहेर गेली, तर अमेरिकन बाजाराची स्थिती १९८७ सारखी होऊ शकते. अतिशय गंभीर भाग म्हणजे भारतात बाजार उघडल्यानंतर सेन्सेक्स ३००० तर निफ्टी ११०० अंकांनी घसरला! ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल.

### आजचा दिवस म्हणजे 'ब्लॅक मंडे' च ?

अमेरिकन बाजारतज्ज्ञ जिम क्रेमर म्हणाल, की दि. ७ एप्रिल १९८७ प्रमाणे सोमवारचा दिवस शेअर बाजारासाठी सर्वात वाईट दिवस ठरू शकतो. सीएनबीसीवरील त्यांच्या मॅड मनी शोमध्ये, क्रेमर यांनी स्पष्टपणे इशारा दिला. ट्रम्प यांनी रेसिप्रोकल शुल्क लागू न केलेल्या देशांशी संपर्क साधला नाही,तर बाजारात १९८७ सारखा क्रॅश येऊ शकतो!

### कंपन्यांना प्रोत्साहन द्या..

ते पुढे म्हणाले, की जर राष्ट्राध्यक्षांनी नियमांचे पालन करणाऱ्या देशांना आणि कंपन्यांना प्रोत्साहन दिले नाही तर आपल्याला १९८७ सारखे दृश्य दिसू शकते. दि. २ एप्रिल रोजी ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर किमान १० टक्के टॅरिफ लागू करण्याची घोषणा केली. यानंतर अमेरिकन बाजारात मोठी घसरण झाली आहे.

### पूर्वी, काळा सोमवार काय होता?

हे संकट केवळ अमेरिकेपुरते मर्यादित राहिले नाही, तर युरोप, आशिया आणि भारतातील बाजारपेठांनाही या घसरणीचा फटका बसला आहे. गुंतवणूकदारांचे अब्जावधी डॉलर्स बुडाले. जिम क्रेमर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरुन याबाबत इशारा दिला आहे. ते म्हणाले, की १९८७ सारखी परिस्थिती जगाला परवडणारी नाही. दि. १९ ऑक्टोबर १९८७ मध्ये, डाऊ जोन्स एका दिवसात २२.६ टक्क्यांनी घसरला, जो आतापर्यंतचा सर्वात मोठा एकदिवसीय क्रॅश मानला जातो. त्यावेळी या घटनेने अमेरिका हादरली आणि नंतर अनेक आर्थिक धोरणे बदलण्यात आली होती.

### भारताला सावरायला हवं..

शेअर मार्केटच्या अशा प्रकारच्या घसरणीनंतर भारताला कडक आर्थिक उपाययोजना करणे गरजेचे आहे आणि या आर्थिक संकटाच्या खाईतून बाहेर पडणे आवश्यक आहे, हेच खरे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उष्ण वारे, उकाड्याने मुंबईकर हैराण!

## राज्यात काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून मुंबईमध्ये उन्हाचा तडाखा वाढला असून दुपारनंतर बाहेर फिरताना नागरिकांना घामाच्या धारा लागत आहेत. वाढता उकाडा नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. तापलेल्या वातावरणामुळे सोमवारीही मुंबईकरांच्या अंगाची काहिली होत आहे. सकाळपासूनच उन्हाच्या तीव्र झळा जाणवत होत्या. रेल्वेतील प्रवासही असह्य करणारा होता.**




दरम्यान, असे वातावरण मंगळवारी आणि बुधवारीही कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.शहर आणि उपनगरांत सोमवारी दुपारी उन्हाचा दाह सोसावा लागत होता.कडकडीत ऊन, घामाच्या धारा आणि प्रचंड उकाड्याने मुंबईकर हैराण झाले आहेत. मागील काही दिवसांपासून उन्हाच्या झळांनी नागरिकांची लाही होत आहे. सोमवारी सकाळपासूनच उकाडा जाणवत होता. सकाळी १० नंतरच उन्हाची तीव्रता वाढली आणि झळा जाणवू लागल्या. रस्त्यावर फिरताना उन्हाचे चटके बसत होते. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सोमवारी ३३.६ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३६.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. रविवारच्या तुलनेत सोमवारी सांताक्रूझ येथील तापमानात २.४ अंशानी वाढ झाली. येथील तापमान सोमवारी सरासरीपेक्षा अधिक नोंदले गेले. ठाणे येथे सोमवारी ३८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. रविवारच्या तुलनेत सोमवारी ठाणे येथील कमाल तापमानात काहीशी वाढ झाली.हीच स्थिती मंगळवार आणि बुधवारीही कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत तापमान ३५ ते ३७ अंश सेल्सिअसपर्यंत राहील. त्यानंतर शुक्रवारपासून तापमानात काहीशी घट होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.दरम्यान, समुद्रकिनारा जवळ असल्यामुळे मुंबईत आर्द्रतेचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मुंबईकर घामाच्या धारांनी हैराण होत आहेत. घामामुळे शरीरातील पाणी निघून जाते. त्यामुळे गळून गेल्यासारखे वाटणे, थकवा येणे अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात आढळतात. अंगाची लाहीलाही करणारे ऊन आणि घामाच्या धारांनी मुंबईकर त्रस्त झाले आहेत.राज्यात सोमवारी सर्वाधिक तापमानाची नोंद अकोला येथे झाली आहे. येथे कमाल तापमान ४४.२ अंश सेल्सिअस इतके होते. याखालोखाल जळगाव ४२.५ अंश सेल्सिअस, लोहगाव ४२.२ अंश सेल्सिअस, मालेगाव ४१.६ अंश सेल्सिअस, परभणी ४२.१ अंश सेल्सिअस, तर अमरावती येथे ४३.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.अवकाळी पावसाचे वातावरण ओसरताच राज्यातील तापमानात पुन्हा वाढ होऊ लागली आहे. अनेक भागात सरासरीपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली आहे. कोकणातही उष्ण व दमट वातावरणाचा अंदाज व्यक्त केला आहे. यामुळे पुढील काही दिवस कोकणात असह्य उकाडा सहन करावा लागेल. याचबरोबर तेथील तापमानातही वाढ होण्याची शक्यता आहे.राज्यातील काही भागात ढगाळ वातावरणाचा अंदाज आहे. तर, विदर्भातील काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये अकोला, नागपूर तसेच यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागात मंगळवारी उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. दरम्यान, असे वातावरण मंगळवारी आणि बुधवारीही कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.शहर आणि उपनगरांत सोमवारी दुपारी उन्हाचा दाह सोसावा लागत होता. कडकडीत ऊन, घामाच्या धारा आणि प्रचंड उकाड्याने मुंबईकर हैराण झाले आहेत. मागील काही दिवसांपासून उन्हाच्या झळांनी नागरिकांची लाही होत आहे. सोमवारी सकाळपासूनच उकाडा जाणवत होता.

### काही भागात पावसाचा अंदाज

सकाळी १० नंतरच उन्हाची तीव्रता वाढली आणि झळा जाणवू लागल्या. रस्त्यावर फिरताना उन्हाचे चटके बसत होते. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सोमवारी ३३.६ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३६.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. रविवारच्या तुलनेत सोमवारी सांताक्रूझ येथील तापमानात २.४ अंशानी वाढ झाली. येथील तापमान सोमवारी सरासरीपेक्षा अधिक नोंदले गेले. ठाणे येथे सोमवारी ३८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. रविवारच्या तुलनेत सोमवारी ठाणे येथील कमाल तापमानात काहीशी वाढ झाली.हीच स्थिती मंगळवार आणि बुधवारीही कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# कामे पूर्ण केल्याचा अहवाल १५ दिवसांत द्या!

## पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांचे पालिका अधिकाऱ्यांना निर्देश

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई उपनगरात सुरू असलेली रस्त्याची कामे ३१ मे पर्यंत पूर्ण करा, आता कोणतेही नवीन काम हाती घेऊ नका, रस्त्याची कामे पूर्ण केल्याचा रस्तेनिहाय अहवाल १५ दिवसांत द्या, पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी पालिका अधिकाऱ्यांना दिल्या.**



वांद्रे, खार, सांताक्रूझ पश्चिम विभागात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामाची पाहणी ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी केली. यावेळी शेलार यांनी वरील निर्देश दिले. या पाहणीला अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर आणि संबधित अधिकारी उपस्थित होते. तसेच जलअभियंता विभाग, पर्जन्य जलवाहिन्या विभाग, रस्ते विभाग आदी विभागांचे अधिकारी व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.खड्डेमुक्त रस्त्यांसाठी मुंबई महानगरपालिकेने रस्ते कॉंक्रीटीकरणाची मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत १ हजार ३३३ किलोमीटर रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाचे काम दोन टप्प्यांमध्ये हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यामधील एकूण ६९८ रस्त्यांची कामे (३२४ किलोमीटर) तर, दुसऱ्या टप्प्यात एकूण १४२० रस्त्यांचे (३७७ किलोमीटर) कॉंक्रीटीकरण प्रस्तावित आहे. ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. रस्ते कामांसाठी ९ कंत्राटदार नेमण्यात आले आहेत. काही कंत्राटदार अपेक्षित गतीने, तर काही कंत्राटदार धीम्या गतीने काम करीत आहेत. उपनगरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची कामे सुरू असल्यामुळे उपनगरवासियांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे निकृष्ट असल्यामुळे वारंवार रस्ते खोदावे लागत आहेत.मुंबई महानगरपालिकेच्या एच पश्चिम विभागातील वांद्रे, खार, सांताक्रूझ पश्चिम या भागातील ७४ रस्त्यांची सिमेंट कॉंक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांची पाहणी शेलार यांनी केली. त्यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध निर्देश दिले. रस्त्यांची कामे करताना विविध उपयोगिता वाहिन्यांच्या संस्थांसोबत समन्वय नसल्याकडे शेलार यांनी यावेळी प्रशासनाचे लक्ष वेधले.वांद्रे, खार, सांताक्रूझ पश्चिम विभागात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामाची पाहणी ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी केली. यावेळी शेलार यांनी वरील निर्देश दिले. या पाहणीला अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर आणि संबधित अधिकारी उपस्थित होते.

### रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाले

तसेच जलअभियंता विभाग, पर्जन्य जलवाहिन्या विभाग, रस्ते विभाग आदी विभागांचे अधिकारी व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.खड्डेमुक्त रस्त्यांसाठी मुंबई महानगरपालिकेने रस्ते कॉंक्रीटीकरणाची मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत १ हजार ३३३ किलोमीटर रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाले आहे.

# तेल व अन्नधान्याच्या किमती घटल्या!

## अमेरिकन नागरिकांच्या निदर्शनांनंतर ट्रम्प यांचं वक्तव्य

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'जशास तशा' (परस्पर) करांची घोषणा केल्यानंतर जगभरातील कित्येक देशांच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम दिसू लागले आहे. भारतासह बहुसंख्य देशांचे शेअर बाजार गडगडले आहेत. गुंतवणूकदारांना अब्जावधी डॉलर्सचा फटका बसला आहे. अशातच चीनने अमेरिकेला प्रत्युत्तर देत शुक्रवारी अमेरिकी वस्तूंवर आणखी ३४ टक्के आयातशुल्क लागू केलं. तर आंतरराष्ट्रीय बाजारात मक्तेदारी असलेल्या काही दुर्मिळ संयुगांच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवरही शी जिनपिंग यांच्या सरकारने निर्बंध लावले आहेत. जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये छेडलेल्या या व्यापारयुद्धाचा इतर सर्वच देशांना फटका बसला आहे.**



दरम्यान, ट्रम्प यांचे निर्णय अमेरिकेतील सरसकट जनतेनेही स्वीकारले नाहीत. शनिवारपासून अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरू लागले आहेत. रविवारी अनेक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी ट्रम्प सरकारविरोधात निदर्शने केली. दरम्यान, या सगळ्या घडामोडींनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "तेलाच्या, अन्नधान्याच्या किंमती कमी झाल्या आहेत. देशातील महागाई कमी झाली आहे."डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे की "तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत, व्याजदर कमी झाले आहेत (मंद गतीने चालणाऱ्या फेडरलने देखील दर कमी करायला हवेत!), अन्नधान्याच्या किंमती देखील कमी झाल्या आहेत.

महागाई राहिलेली नाही. दीर्घकाळापासून अमेरिकेचा गैरफायदा घेतला जात होता, तीच अमेरिका आता तिचा गैरफायदा घेणाऱ्या देशांकडून आयात शुल्काच्या माध्यमातून दर आठवड्याला अब्जावधी डॉलर्स आणत आहे. अमेरिकेकडून आयात शुल्क वसूल करणाऱ्या देशांकडून आपण अब्जावधी डॉलर्स आणत आहोत."अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले, "अमेरिकेचा गैरफायदा घेणारा सर्वात मोठा देश म्हणजे चीन, त्यांची बाजारपेठ आता कोसळत आहे. त्यांनी इतकी वर्षे आपल्याकडून आयातशुल्क वसूल केलं. आता त्यांनी आपल्यावरील शुल्क ३४ टक्क्यांपर्यंत वाढवलं आहे, हे हास्यास्पद आहे. आपण परस्पर आयात शुल्काचा निर्णय घेतल्यानंतर त्याला प्रत्युत्तर न देण्याच्या माझ्या इशाऱ्याला काहींनी मान्यता दिली नाही. या देशांनी अनेक दशकांपासून अमेरिकेचा गैरफायदा घेतला आहे. आपला देश आणखी बरंच काही करू शकला असता, मात्र आताच्या स्थितीला भूतकाळातील 'नेते' जबाबदार आहेत. मात्र आपण अमेरिकेला पुन्हा महान बनवूया."दरम्यान, ट्रम्प यांचे निर्णय अमेरिकेतील सरसकट जनतेनेही स्वीकारले नाहीत. शनिवारपासून अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरू लागले आहेत. रविवारी अनेक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी ट्रम्प सरकारविरोधात निदर्शने केली. दरम्यान, या सगळ्या घडामोडींनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "तेलाच्या, अन्नधान्याच्या किंमती कमी झाल्या आहेत. देशातील महागाई कमी झाली आहे."डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे की "तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत, व्याजदर कमी झाले आहेत (मंद गतीने चालणाऱ्या फेडरलने देखील दर कमी करायला हवेत!), अन्नधान्याच्या किंमती देखील कमी झाल्या आहेत. महागाई राहिलेली नाही. दीर्घकाळापासून अमेरिकेचा गैरफायदा घेतला जात होता, तीच अमेरिका आता तिचा गैरफायदा घेणाऱ्या देशांकडून आयात शुल्काच्या माध्यमातून दर आठवड्याला अब्जावधी डॉलर्स आणत आहे.

### अमेरिकेला पुन्हा महान बनवूया

अमेरिकेकडून आयात शुल्क वसूल करणाऱ्या देशांकडून आपण अब्जावधी डॉलर्स आणत आहोत."अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले, "अमेरिकेचा गैरफायदा घेणारा सर्वात मोठा देश म्हणजे चीन, त्यांची बाजारपेठ आता कोसळत आहे. आता त्यांनी आपल्यावरील शुल्क ३४ टक्क्यांपर्यंत वाढवलं आहे, हे हास्यास्पद आहे. आपण परस्पर आयात शुल्काचा निर्णय घेतल्यानंतर त्याला प्रत्युत्तर न देण्याच्या माझ्या इशाऱ्याला काहींनी मान्यता दिली नाही. या देशांनी अनेक दशकांपासून अमेरिकेचा गैरफायदा घेतला आहे. आपला देश आणखी बरंच काही करू शकला असता, मात्र आताच्या स्थितीला भूतकाळातील 'नेते' जबाबदार आहेत. मात्र आपण अमेरिकेला पुन्हा महान बनवूया.

---

# ट्रम्प यांनी भ्रमाचा भोपळा फोडला

## शेअर बाजाराचा उल्लेख करत राहुल गांधींचा पंतप्रधानांवर हल्लाबोल

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशभर सध्या केवळ भारतीय शेअर बाजाराची होत असलेली घसरण आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं नवं आयात शुल्क (टॅरिफ) धोरण चर्चेत आहे. ट्रम्प यांच्या निर्णयाचा भारतीय शेअर बाजारावर मोठा परिणाम झाला असून कोट्यवधी भारतीयांना त्याचा फटका बसला आहे. दरम्यान, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी म्हणाले, "डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींच्या भ्रमाचा भोपळा फोडला आहे. आता आपल्याला सत्याचा सामना करावा लागेल."**



राहुल गांधी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट करून केंद्र सरकारवर टीका केली आहे. ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणाचा हवाला देत राहुल गांधी यांनी म्हटलं आहे की "ट्रम्प यांनी मोदींच्या भ्रमाचा भोपळा फोडला आहे. आता आपल्याला वास्तविकतेचा सामना करावा लागेल. या परिस्थितीत पंतप्रधान मोदी आपल्याला कुठेच दिसत नाहीयेत. भारताकडे आपल्या आर्थिक भविष्यासाठी केवळ एक लवचिक व उत्पादन-आधारित अर्थव्यवस्था उभारण्याचा पर्याय आहे, जी सर्व भारतीयांसाठी लाभदायी ठरेल."राहुल गांधी यांनी पाटण्यात आयोजित संविधान संरक्षण संमेलनाला संबोधित केलं. यावेळी ते म्हणाले, "अमेरिकेच्या अध्यक्षांनी उचललेल्या पावलांमुळे भारतीय शेअर बाजार गडगडला आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांनी भारताचा शेअर बाजार हादरवला आहे. भारतातील एक टक्क्याहून कमी लोक शेअर बाजारात गुंतवणूक करतात. याचाच अर्थ असा की शेअर बाजार सामान्य जनतेसाठी नाही. मात्र, काही लोक इथे मोजता येणार नाहीत इतके पैसे कमावतात. मात्र, सामान्य माणसाला याचा काय फायदा होतो? काहीच नाही."गेल्या काही दिवसांत जगभरातील अनेक देशांमधील शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर परस्पर आयात शुल्क लागू केलं आहे. त्याचाच शेअर बाजारांवर परिणाम झाल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. ट्रम्प यांनी लागू केलेल्या आयात शुल्कामुळे जागतिक स्तरावर परिणाम दिसत आहेत. याचा भारतावर परिणाम झाला आहे. ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यापासून शुल्कवाढीवर भर दिला आहे. राहुल गांधी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट करून केंद्र सरकारवर टीका केली आहे. ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणाचा हवाला देत राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

### मोदी आपल्याला कुठेच दिसत नाही

आता आपल्याला वास्तविकतेचा सामना करावा लागेल. या परिस्थितीत पंतप्रधान मोदी आपल्याला कुठेच दिसत नाहीयेत. भारताकडे आपल्या आर्थिक भविष्यासाठी केवळ एक लवचिक व उत्पादन-आधारित अर्थव्यवस्था उभारण्याचा पर्याय आहे, जी सर्व भारतीयांसाठी लाभदायी ठरेल.

## राजेश खन्नाचा धाकटा जावई कोण

दिवंगत राजेश खन्ना हे हिंदी सिनेसृष्टीतील पहिले सुपरस्टार होते. एकेकाळी राजेश खन्ना यांनी संपूर्ण सिनेसृष्टी व्यापून टाकली होती. 'दो रास्ते', 'आराधना', 'हाथी मेरे साथी', 'बावर्ची', 'सफर', 'खामोशी', 'आनंद', 'अमर प्रेम' अशा अनेक चित्रपटातून त्यांनी साकारलेल्या विविधांगी भूमिका प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या होत्या. राजेश खन्ना यांनी लोकप्रियतेची एक वेगळीचं उंची गाठली होती, जी अजूनपर्यंत कुठलाही अभिनेता गाठू शकला नाही. राजेश खन्ना यांच्या पत्नी डिंपल कपाडिया यांनी आपल्या दमदार अभिनयाने बॉलीवूडमध्ये एक वेगळं स्थान निर्माण केलं. पण राजेश खन्ना व डिंपल कपाडिया यांच्या मुली ट्विंकल आणि रिंकी खन्ना या दोघींना बॉलीवूडमध्ये तितकं यश मिळालं नाही. ट्विंकल आणि रिंकीने बॉलीवूडमध्ये पाऊल ठेवलं. पण, त्यांना काही काळानंतर जाणवलं की, आपण या क्षेत्रासाठी बनलो नाहीत. त्यामुळे ट्विंकलने आपल्या लेखणीने प्रेक्षकांची मनं जिंकली. एवढंच नव्हेतर ती निर्माती झाली. तर रिंकी खन्ना सतत चित्रपट फ्लॉप झाल्यामुळे लग्न करून विदेशात स्थायिक झाली. ट्विंकल खन्नाचा पती कोण आहे हे सर्वश्रुत आहे. पण आज आपण रिंकी खन्नाच्या पतीबद्दल जाणून घेणार आहोत.राजेश खन्नांचा धाकटा जावई, रिंकी खन्नाच्या पतीचं नाव समीर सरन आहे. समीरचा बॉलिवूडशी काहीही संबंध नसला तरी तो एक श्रीमंत व्यक्ति असून कोट्यवधी संपत्तीचा मालक आहे. रिंकी खन्नाने १९९९मध्ये 'प्यार में कभी कभी' या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. तिचा हा पहिलाच चित्रपट फ्लॉप झाला. त्यानंतर रिंकीने बरेच चित्रपट केले. 'जिस देश में गंगा रहता है', 'ये है जलवा', 'झंकार बीट्स', 'चमेली' आणि 'प्राण जाए पर शान ना जाए' यांच्यासारख्या बऱ्याच चित्रपटांमध्ये तिने काम केलं.

# भारतातील टॉप १० अभिनेते कोण आहेत?


बॉलीवूड कलाकार, इंडस्ट्रीतील गॉसिप, आघाडीचे अभिनेते, चित्रपटांचं कलेक्शन या सगळ्या गोष्टींची नेहमीच चर्चा सुरू असते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये साऊथ इंडस्ट्री बॉलीवूडवर भारी पडल्याचं पाहायला मिळत आहे. साऊथ मधल्या कलाकारांची क्रेझ देखील हळुहळू संपूर्ण देशभरात निर्माण होऊ लागली आहे. यामुळेच प्रदर्शनाच्या मार्गावर असलेल्या अनेक चित्रपटांमध्ये दाक्षिणात्य कलाकारांची वर्णी लागल्याचं पाहायला मिळत आहे. साऊथ इंडस्ट्रीच्या वाढत्या वर्चस्वामुळेच २०२५ मध्ये सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत शाहरुख, सलमान नव्हे तर चक्क दोन दाक्षिणात्य अभिनेत्यांनी बाजी मारली आहे. 'फोर्ब्स इंडिया'च्या माहितीनुसार भारतात सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांची यादी पाहूयात...जवळपास ३५० कोटींच्या एकूण संपत्तीसह, अल्लू अर्जुन भारतातील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता ठरला आहे. २०२१ मध्ये अल्लू अर्जुनचा 'पुष्पा: द राईज' सिनेमा प्रचंड गाजला. तर, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'पुष्पा : द रुल – भाग २'ने सुद्धा सगळे रेकॉर्ड्स मोडले. या सिनेमाच्या दुसऱ्या भागासाठी अल्लू अर्जुनने तब्बल ३०० कोटींचं मानधन घेतलं होतं.अल्लू अर्जुनच्या पाठोपाठ सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्यांमध्ये दुसरा क्रमांक लागतो जोसेफ विजय चंद्रशेखर, ज्याला थलपती विजय म्हणून देखील ओळखलं जातं.

## आशिकी 3'लवकरच भेटीस



अनुराग बासू दिग्दर्शित 'आशिकी ३' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात कार्तिक आर्यनसह दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला पाहायला मिळणार आहे. सध्या 'आशिकी ३' चित्रपटाचं जोरदार चित्रीकरण सुरू आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाच्या चित्रीकरणाचे बरेच व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर आता धक्कादायक व्हिडीओ समोर आला आहे. व्हायरल व्हिडीओमध्ये 'आशिकी ३' चित्रपटात झळकणारी अभिनेत्री श्रीलीलाबरोबर गैरवर्तन केल्याचं पाहायला मिळत आहे. यावेळी श्रीलीलासह कार्तिक आर्यन दिसत आहे. पण, तो तिच्या पुढे चालत असल्यामुळे अभिनेत्रीबरोबर नेमकं काय घडलं? हे त्याला कळतं नाही. मात्र चाहत्याच्या गैरवर्तनामुळे श्रीलीला घाबरलेली पाहायला मिळत आहे.व्हिडीओत, कार्तिक व श्रीलीला यांना पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचं दिसत आहे. यावेळी सुरक्षा रक्षक गर्दीतून दोघांना सांभाळून नेत असतात . पण, याचवेळी गर्दीतून एक चाहता चालत असलेल्या श्रीलीलाचा अचानक हात पकडून तिला जोरात खेचतो. त्यामुळे श्रीलीला पूर्णपणे मागे खेचली जाते. हे पाहताच सुरक्षा रक्षक तिला गर्दीतून कसेबसे बाहेर काढतात.

## 'ग्राउंड झिरो'मध्ये दिसणार मराठी कलाकार



'ग्राउंड झिरो'(GROUND ZERO) या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. बॉलीवूड अभिनेता इमरान हाश्मी(EMRAAN HASHMI) या चित्रपटातून दीर्घ काळानंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. 'ग्राऊंड झिरो'मधून तो पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जवळजवळ तीन मिनिटांचा हा ट्रेलर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. हा चित्रपट खऱ्या घटनांवर आधारित आहे. इमरान हाश्मी या चित्रपटात सैनिकाच्या भूमिकेत दिसणार आहे.'ग्राउंड झिरो'च्या प्रदर्शित झालेल्या ट्रेलरमध्ये पाहायला मिळते की, २००१ सालची ही गोष्ट आहे. काश्मिरी तरुणांना भारतीय सैन्याविरुद्ध बंड करण्यासाठी अतिरेकी त्यांना प्रोत्साहन देत असल्याचे नेटवर्क भारतीय सैन्य टॅप करते. त्यामध्ये ऐकायला मिळते की, खऱ्या मुजाहिदच्या जीवनाचा अर्थ हृदयात जोश आणि हातात बंदूक. या ट्रेलरमध्ये भारतीय सैन्य व अतिरेकी यांच्यातील गोळीबार पाहायला मिळतो. एका भिंतीवर मजकूर लिहिलेला दिसतो, "सैनिका, तुझ्या मृत्यूने तुला इथे बोलावले आहे. काश्मीरचा बदला हा गाझी घेईल." काश्मीर खोऱ्यातील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत जाते. त्याचा सामना करण्यासाठी टीमचे प्रमुख मुकेश तिवारी टीममधील त्यांच्यातील सर्वोत्तम व्यक्तीची निवड करतात.

# इंटिमेट सीन करणं अवघड आहे



मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री अदिती पोहनकरने अनेक वेब सीरिजमध्ये दमदार भूमिका केल्या आहेत. 'आश्रम'मध्ये पम्मीची भूमिका करून तिने चाहत्यांची मनं जिंकली. अदितीने 'आश्रम'मध्ये अभिनेता बॉबी देओलबरोबर इंटिमेट सीन्स केले आहेत. या सीनच्या शूटिंगबद्दल तिने प्रतिक्रिया दिली आहे. इंडिया टुडे डिजिटलशी बोलताना अदितीने इंटिमेट सीनच्या शूटिंगसंदर्भात मत व्यक्त केलं. असे सीन शूट करताना कलाकारांचा एकमेकांवर विश्वास असणं आवश्यक असतं, असं ती म्हणाली. "इंटिमेट सीन करणं अवघड आहे, कारण ते करताना दोन्ही कलाकार कंफर्टेबल असावे लागतात. इम्तियाज सरांनी मला एकदा सांगितले होते की अशा दृश्यांमध्ये अभिनेत्यांना जास्त काम करावं लागतं," असं अदिती म्हणाली. असे सीन करताना दोन कलाकारांमध्ये संवाद असायला हवा, असं अदितीने नमूद केलं. "तुम्ही विचारता, 'काही चूकतंय का? तुम्ही ठीक आहात का?' आणि सोबतच्या व्यक्तीला सुरक्षित वाटत असल्याची खात्री करा. अशा प्रकारे आम्ही 'शी' व 'आश्रम'मधील सीन शूट केले. 'आश्रम'मधील आमचा बाँड खूप मजबूत होता. सीन नीट झाला नाही आणि कट करावा लागला तर आम्ही पोझिशन बदलायचो नाही. त्या सीनमध्येच काही क्षण एकमेकांशी बोलून सगळं नीट असल्याची खात्री करायचो," असं अदिती म्हणाली. अदितीने सांगितलं की त्यावेळी त्यांच्याकडे सेटवर इंटिमसी कोऑर्डिनेटर नव्हते. "इंटिमसी कोऑर्डिनेटर असतात अशी संकल्पना अस्तित्वात आहे हे मला माहीत नव्हतं. पण मला असं वाटतं की दोन कलाकारांमध्ये जितकं जास्त अंतर असेल तितकं ते पडद्यावर विचित्र दिसेल. एकमेकांशी बोलणं, संवाद साधून कंफर्टेबल होणं या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात. कलाकारांमध्ये भावनिक अंतर नसते, तेव्हाच असे सीन उत्तमरित्या करता येतात," असं अदिती म्हणाली.केमिस्ट्रीबद्दल अदिती म्हणाली, "असे सीन किती खरे वाटतात, यातच त्याचे सौंदर्य असते. असे सीन करताना जेव्हा दोन्ही कलाकारांना एकमेकांबरोबर सुरक्षित वाटतं तेव्हा ते सीन उत्तमरित्या होतात. असे सीन करताना दोन्ही कलाकारांना मर्यादा माहीत असते, त्यामुळे ते ती मर्यादा उलंडत नाही आणि मर्यादा ओलांडायलादेखील नको. अभिनेत्री किंवा अभिनेत्याला असे सीन करताना भीती वाटायला नको. जेव्हा एकमेकांवर विश्वास असतो तेव्हा ते स्क्रीनवर दिसून येतं. आमच्या शरीराला या सीनच्या मर्यादा समजतात आणि आम्ही त्याचा आदर करतो. असे सीन करताना सुरक्षिततेची भावनाच सर्वात महत्त्वाची असते."

# किंग कोहलीने घडवला इतिहास!

## जलद 13 हजार धावा करणारा तो जगातील दुसरा फलंदाज

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**आयपीएलमधील आजचा सामना मुंबई इंडियन्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघांमध्ये खेळवला जात आहे. वानखेडेच्या मैदानावर हा सामना सुरू आहे. दरम्यान सलामीला आलेल्या विराट कोहलीने दणक्यात सुरूवात करत अवघ्या २९ चेंडूत अर्धशतक झळकावले. पण नंतर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात विराट कोहली झेलबाद झाला. पण दरम्यान विराट कोहलीने टी-२० मधील अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.**



विराट कोहलीने मुंबईविरूद्ध सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी करत टी-२० क्रिकेटमध्ये एक असा विक्रम केला आहे. जो आजवर कोणत्याच भारतीय फलंदाजाला जमलेला नाही. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात फक्त ५ असे फलंदाज आहेत ज्यांनी आजवर हा विक्रम आपल्या नावे केला आहे.वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना विराट कोहलीने क्रिकेटमध्ये १३ हजार धावा पूर्ण केल्या. ३६ वर्षीय कोहलीने आपल्या डावात १७ धावा करत ही कामगिरी केली. कोहली T20 मध्ये १३ हजार धावा करणारा पहिला भारतीय आणि हा पराक्रम करणारा जगातील फक्त पाचवा फलंदाज आहे. तर सर्वात जलद १३ हजार धावा करणारा तो जगातील दुसरा फलंदाज आहे.कोहलीने आपल्या ३८६ व्या टी-२० डावात ही कामगिरी केली. यासह, वेस्ट इंडिजचा दिग्गज ख्रिस गेलनंतर सर्वात कमी सामन्यांमध्ये ही कामगिरी करणारा तो फलंदाज ठरला. गेलने केवळ ३८१ डावात १३ हजार धावा केल्या होत्या. इंग्लिश फलंदाज अॅलेक्स हेल्सला जवळपास ९० डावांनी मागे टाकत कोहलीने या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे.शतकांच्या बाबतीतही कोहली भारतीय फलंदाजांमध्ये आघाडीवर आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत ९ शतकं झळकावली आहेत. यातील आठ आयपीएलमधील शतकं आहेत. कोहलीने याआधी २०२१ च्या आयपीएलमध्ये १० हजार टी-२० धावांचा टप्पा पार केला होता. बाबर आझम आणि ख्रिस गेलनंतर विराट हा तिसरा वेगवान फलंदाज होता. त्याने २९९ डावात ही कामगिरी केली. कोहलीच्या आयपीएलमध्ये ८ हजारहून अधिक धावा आहेत. तो लीगमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे.आयपीएल २०२५ च्या रायव्हलरी विकमधील पहिलाच सामना मुंबई इंडियन्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघांमध्ये खेळवला जात आहे. वानखेडेवर होत असलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात संघाचा सर्वात महत्त्वाचा गोलंदाज जसप्रीत बुमराह परतला आहे. तर गेल्या सामन्यात संघाबाहेर असलेला माजी कर्णधार रोहित शर्माही परतला आहे. मुंबईच्या ताफ्यात बोल्ट, चहर आणि बुमराह ही कमालीची गोलंदाजी तिकडी दिसणार आहे. यापैकी बोल्टची पहिल्याच षटकात जादू पाहायला मिळाली. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात जसप्रीत बुमराह परतल्याने अश्वनी कुमारला या सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही. रोहित शर्मा या सामन्यातही इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळताना दिसणार आहे. तर आरसीबीच्या ताफ्यात कोणताच बदल करण्यात आलेला नाही.मुंबईकडून बोल्टच्या हातात पहिला चेंडू होता. तर आरसीबीकडून फिल सॉल्ट आणि विराट कोहलीची जोडी सलामीसाठी उतरली. बोल्टच्या पहिल्याच चेंडूवर सॉल्टने चौकार मारत दणक्यात सुरूवात केली.

### 8 हजारहून अधिक धावा

पण बोल्टने पुढच्याच चेंडूवर आपल्या भेदक गोलंदाजीने थेट मिडल स्टंपला दणका देत सॉल्टला क्लीन बोल्ड केलं.आरसीबीने पहिल्याच षटकात विकेट गमावली असली तरी त्यांच्या आक्रमक फलंदाजीची झलक पाहायला मिळाली. विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांनी पॉवरप्लेमध्ये ६ षटकांत १ बाद ७३ धावा केल्या. तर संघाने १० षटकांत १०० धावांचा आकडा गाठला. देवदत्त पडिक्कल विघ्नेश पुथूरच्या गोलंदाजीवर ९व्या षटकात झेलबाद झाला. तर विराट कोहलीने विघ्नेश पुथूरच्या गोलंदाजीवर षटकार लगावत २९ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले.रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यात वैयक्तिक संघर्ष असल्याची चर्चा अधूनमधून रंगत असली, तरी रविवारी विराट कोहलीने रोहितबरोबरचे आपले संबंध वर्षानुवर्षांचे असून ते सामायिक अनुभव, विश्वास आणि परस्पर आदराने बांधले गेले असल्याचे वक्तव्य केले आहे.

---

## चार संघांनी केलं दुर्लक्ष, गुजरातने हेरला हिरा

## गुजरात टायटन्ससाठी शेरफन रुदरफोर्ड ठरतोय किमयागार

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**वेस्ट इंडिजचा तडाखेबंद फलंदाज शेरफन रूदरफोर्डची आयपीएलमध्ये खेळण्याची ही पहिलीच वेळ नव्हे. पण यंदाच्या हंगामात रुदरफोर्डने आपली ताकद दाखवून दिली आहे. रविवारी झालेल्या लढतीत रुदरफोर्डने १६ चेंडूत ३५ धावांची वेगवान खेळी करत गुजरातचा विजय सोपा करून टाकला. गुजरात टायटन्सने सातत्याने रुदरफोर्डला इम्पॅक्ट प्लेयर म्हणून उपयोगात आणलं आहे. रुदरफोर्डने त्याचा इम्पॅक्ट प्रत्येक लढतीत दाखवला आहे.**



रुदरफोर्ड आयपीएल स्पर्धेत चार संघांकडून खेळला आहे पण त्याच्या गुणवत्तेला खरा न्याय गुजरात टायटन्स संघाने दिला आहे.रुदरफोर्डने पंजाबविरुद्ध अहमदाबाद इथे झालेल्या लढतीत ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर मुंबईविरुद्ध १८ धावा केल्या.
बंगळुरुविरुद्ध रुदरफोर्डने नाबाद ३० धावांची खेळी केली. हाच फॉर्म कायम राखत रुदरफोर्डने हैदराबादविरुद्धही शानदार खेळी साकारली.आयपीएलच्या २०१९ हंगामात रुदरफोर्डने पदार्पण केलं.त्यावर्षी तो दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळला. त्याला ७ सामन्यात संधी मिळाली. दिल्लीने पुढच्याच वर्षी त्याला रिलीज केलं. २०२० मध्ये तो मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता.त्र त्याला एकाही सामन्यात संधी मिळाली नाही.
२०२२मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने संघात समाविष्ट केलं. पण त्याला केवळ तीन सामन्यात खेळवण्यात आलं. २०२४ मध्ये जेतेपद पटकावणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा तो हिस्सा होता. पण अख्ख्या हंगामात त्याला एकाही सामन्यात संधी मिळाली नाही. या हंगामाच्या आधी झालेल्या लिलावात गुजरात टायटन्स संघाने २.६ कोटी रुपये खर्चून त्याला ताफ्यात समाविष्ट केलं. गुजरातच्या संघात न्यूझीलंडचा ग्लेन फिलीप्सही आहे. अफलातून क्षेत्ररक्षण करणाऱ्या आणि उत्तम फॉर्मात असणाऱ्या फिलीप्सला संघात घ्यावं अशी चर्चा सोशल मीडियावर रंगते पण गुजरात संघव्यवस्थापनाने रुदरफोर्डवर विश्वास ठेवला आहे आणि त्यानेही हा विश्वास सार्थ ठरवला आहे. आयपीएलव्यतिरिक्त रुदरफोर्ड कॅरेबियन प्रीमिअर लीग, बांग्लादेश प्रीमिअर लीग, पाकिस्तान सुपर लीग, यांच्यासह लंका प्रीमिअर लीग, मेजर लीग क्रिकेट, आयएलटी२० अशा असंख्य टी२० स्पर्धांमध्ये खेळतो.

### ताकदीने फटकेबाजी हे वैशिष्ट्य

त्यामुळे या प्रकारात खेळण्याचा पुरेसा अनुभव रुदरफोर्डकडे आहे. प्रचंड ताकदीने फटकेबाजी हे रूदरफोर्डचं वैशिष्ट्य आहे. फटकेबाजीच्या बरोबरीने त्याच्या खेळात नजाकतही आहे. तो उपयुक्त मध्यमगती गोलंदाजही आहे. रुदरफोर्डने १२ वनडे आणि २८ टी२० लढतीत वेस्ट इंडिजचं प्रतिनिधित्व केलं आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज
ePaper
। मंगळवार ।
। दि. 8 एप्रिल 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# Moaraya Shikshan Sanstha
# Computer Vacation Batch
# 2024-25

ADMISSION OPEN

**Second Batch**
From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

**Contact: 8087706100/ Computer Lab**
**Registration started**
**Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool**

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

**PRIYADARSHANI**
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
**86687 55826**
**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

# ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

## BBA



**Bachelor of Business Administration**

## BCA



**Bachelor of Computer Applications**

## Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


( Since 2013)
MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com